Letter

क्र/पुनर्वसन/११/लाभक्षेत्र परवानगी/कावि/ ८४/२००६
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव (पुनर्वसन शाखा)
दिनांक २४/१/२००६

प्रति

सब रजिष्टार जामनेर

तहसिलदार जामनेर

विषय :- प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील जमिनींचे हस्तांतरण/विभाजन/वाटणी/ रुपांतरण इ. बाबतच्या निर्बंधाबाबत.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९९९ चे कलम ११(१) ची अधिसुचना प्रसिध्द झालेनंतर कलम १२ नुसार संबधित प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील जमिनीस हस्तांतरण/विभाजन/वाटणी/रुपांतरण इ. साठी निर्बंध लागू झाल्याने पुनर्वसन कायदा कलम २९ (अनुसूची दोन-टप्पा तीन) नुसार लाभक्षेत्रातील संबधित व्यक्तिचे खात्यावरील ३-२३ हेक्टर (आठ एकर) पेक्षा जास्त असल्यास त्यासाठी मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांचे आदेश दिनांक १७/३/२००३ नुसार जिल्हाधिकारी जळगांव यांची परवानगी आवश्यक आहे.

तथापि प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील एकूण धारण जमीन ३-२३ हेक्टर (आठ एकर) पेक्षा कमी असल्यास हस्तांतरण/विभाजन/वाटणी इ. बाबत बंधन नाही. तसेच त्यासाठी पुनर्वसन कायद्यांतर्गत उक्त सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता नाही. याबाबत हस्तांतरण/विभाजन/वाटणीसाठी संबधित नोंदणी अधिकारी (सब रजिष्टार) यांनी संबधितांचे लाभक्षेत्रातील धारण क्षेत्र ३-२३ हेक्टर पेक्षा (आठ एकर) जास्त नाही याबाबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे घेऊन खातर जमा केलेनंतरच नोंदणी करावयाची आहे. तसेच संबधित तलाठी व मंडळ अधिकारी यांनी देखिल याबाबत नोंदी करतांना खबरदारी घ्यावयाची आहे. तहसिलदार यांनी त्याप्रमाणे सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना सुचना द्याव्यात. पुनर्वसन अधिनियमांतर्गत जाणून बूजून खोटी माहिती पुरविणाऱ्यांसाठी पुनर्वसन अधिनियमांत शास्तीची तरतुद विहित केली आहे. तसेच प्रकल्पाचे लाभक्षेत्रात जमीन ३-२३ हेक्टर (आठ एकर) पेक्षा कमी असल्यास तसेच जमीन लाभक्षेत्रात येत नसल्यास याबाबत हस्तांतरण/विभाजन/वाटणी इ. बाबत नोंदणी करतांना सब रजिष्टार व तहसिलदार (महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अंतर्गत विभाजन/वाटणीसाठी) यांनी खालील प्रमाणे सुचनांचे कोटेकोरपणे पालन करुन कार्यवाही करावी.

31 JAN 2006

१. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील कोणत्याही क्षेत्राचे (३-२३ हेक्टर चे आतील सुध्दा) हस्तांतरण नोंदणी/विभाजन वाटणी करु नये.

विषय :- प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील जमिनींचे हस्तांतरण/विभाजन/वाटणी/रुपांतरण इ. बाबतच्या निर्बंधाबाबत.

-------------oo-----------

क्रं/पुनर्वसन/११/लाभक्षेत्र परवानगी/कावि/ ४८२/२००६
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव दिनांक २४/४/२००६

परिपत्रक.

वरील विषयाबाबत या कार्यालयाचे पत्र क्रं/पुनर्वसन/११/लाभक्षेत्र परवानगी/कावि/९६/२००६, दिनांक २४/१/२००६ नुसार सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि याबाबतचे सुचनांचे काटेकोरपणे पालन संबधित अधिकारी यांचे कडून होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने खालील सुधारीत सुचना देण्यात येत आहेत.

१. प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील एकूण धारण जमिन ३-२३ हेक्टर (आठ एकर) पेक्षा जास्त असल्यास त्याबाबतच्या हस्तांतरण/विभाजन/वाटणी/रुपांतरण इ. साठी मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी आवश्यक आहे.
२. प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील एकूण धारण जमीन ३-२३ हेक्टर पेक्षा (आठ एकर) कमी असल्यास हस्तांतरण/विभाजन/वाटणी/रुपांतरण इ. साठी पुनर्वसन कायद्यांतर्गत परवानगीची आवश्यकता नाही.
३. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील कोणत्याही क्षेत्राची (३-२३ हेक्टरचे आतील सुध्दा) हस्तांतरण नोंदणी/वाटणी/विभाजन/रुपांतरण इ. करु नये.
४. जमीन प्रकल्पाचे लाभक्षेत्रात/बुडीत क्षेत्रात येत नसल्यास (३-२३ हेक्टर पेक्षा जास्त असल्यास सुध्दा) पुनर्वसन कायद्यांतर्गत परवानगीची आवश्यकता नाही.
५. वरील प्रकारच्या जमिनीचे हस्तांतरण इ. बाबतचा व्यवहार नोंदवितांना दुय्यम निबंधक यांनी नोंदणी कायदा कलम २२-अ नुसार तसेच नोंदणी कायद्यातील इतर कलमानुसार आवश्यक ती कागदपत्रे घेवून नोंदणी बाबत योग्य ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे वाटणी/विभाजन इ. बाबत कार्यवाही करतांना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ८५ व इतर कलमातील तरतुदीनुसार महसुल अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

वरील सुचनांचे सर्व दुय्यम निबंधक व तहसिलदार यांनी तंतोतंत पालन करावे.

26 APR 2006

Sd×××
(विजय सिंघल)
जिल्हाधिकारी जळगांव.

प्रत :- सह. जिल्हा निबंधक जळगांव यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत :- उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत :- तहसिलदार (सर्व) यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत :- दुय्यम निबंधक (सर्व) यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

जिल्हाधिकारी जळगांव करिता.